क्रमांक.आस्था-प्रलि/पो.भ/२०१७/०१/२०१७
पोलीस अधीक्षक कार्यालय,
सातारा, दिनांक ११/१०/२०१७

**विषय :- सातारा जिल्हा पोलीस भरती सन - २०१७**
**पोलीस शिपाई पदी तात्पुरती नेमणूक.**

***आ दे श***

खालील नमुद उमेदवारांची सातारा जिल्हा पोलीस दलामध्ये पोलीस शिपाई या पदावर रुपये. ५२००-२०२००/- पीबी-१ या वेतन श्रेणीमध्ये पूर्णत: तात्पुरत्या स्वरुपाची नेमणूक हजर झाले दिनांकापासून करण्यात येत आहे. तसेच हजर झाले दिनांकापासून रुपये ६४६०/-एवढे मूळ वेतन व ग्रेड वेतन रुपये २०००/-अधिक नियमानुसार देय असणारे भत्ते देय आहेत.

| अ.क्र | उमेदवारांचे नाव | प्रवर्ग | निवड प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १ | सचिन जयराम अदमाने | अजा | खेळाडू |

मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दि.२५.०८.२०११ रोजी दिलेल्या आदेशास अनुसरुन महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.बीसीसी २०११/प्र.क्र. १०६४/२०११/१६-ब, दि.१२.१२.२०११ मधील तरतुदीनुसार मागासवर्गीय उमेदवारांना त्यांच्या जात प्रमापत्राची वैधता तपासण्याच्या अधीन राहून तात्पुरती नियुक्ती देणेत येत आहे. तरी मागासवर्गीय उमेदवारांनी त्यांच्या नियुक्तीच्या आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता तपासणी करण्यासाठी प्रस्ताव संबंधित जात पडताळणी समितीकडे सादर करुन जात पडताळणी समितीने दिलेल्या पोच पावतीची साक्षांकित प्रत या कार्यालयास सादर करावी. जात पडताळणी समितीने उमेदवारांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरविले तर उमेदवारास दिलेले नियुक्तीचे आदेश रद्द करण्यात येतील आणि अशा उमेदवाराविरुध्द महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देणेचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी. तथापि मा.मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपिठाच्या दि.२५.०८.२०११ रोजीच्या आदेशाच्या विरोधात मा.सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे एसएलपी दाखल करण्यात आलेले असून यावर मा.सर्वोच्च न्यायालयाकडून जे काही आदेश दिले जातील त्या आदेशाच्याही आधिन राहून तात्पुरती नियुक्ती करण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक.अंनियो-१००५/१२६/सेवा-४, दिनांक. ३१ ऑक्टोबर २००५ प्रमाणे, दिनांक.१ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणा-या कर्मचा-यांसाठी सध्या अस्तित्वात असलेल्या निवृत्ती वेतन ऐवजी, परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू करण्यात आलेली आहे. सदर योजनेनुसार आपणांस मूळ वेतन अधिक महागाई वेतन अधिक महागाई भत्ता या रकमेच्या १०% इतके मासिक अंशदान दयावे लागेल. ही रक्कम प्रत्येक महिन्यात आपले वेतन देयकातून वजा करुन घेतली जाईल. सदर शासन निर्णयात नमूद केलेले योजनेची उद्दिष्टे व अटी आपणांस लागू राहतील.

पोलीस शिपाई या पदावर नेमणुक झालेल्या उमेदवाराला मराठी व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर, हिंदी व मराठी भाषा परीक्षा त्या संबंधी केलेल्या नियमानुसार उत्तीर्ण होणे बंधनकारक राहिल.

पोलीस शिपाई पदावर उमेदवारास सातारा जिल्हा या घटकात नियुक्ती देण्यात आलेली आहे. या घटकाव्यतिरीक्त इतर पोलीस घटकात त्याची बदली करता येणार नाही.

महाराष्ट्र शासन,गृह विभाग, मंत्रालय,मुंबई यांचेकडील क्रमांक पीएसबी-०३११/प्र.क्र.५२१/पोल-५-अ, दिनांक २६/९/२०११ अन्वये तुम्ही प्रशिक्षण कालावधीत अथवा प्रशिक्षण संपल्यानंतर पुढील तीन वर्षाच्या कालावधीत पोलीस शिपाई या पदावरील नोकरीचा राजिनामा दिल्यास अथवा सदर पदावरुन कार्यमुक्त करणेस विनंती केलेस तुमच्या प्रशिक्षणावर झालेला खर्च प्रशिक्षण कालावधीत अदा केलेल्या वेतन व भत्त्यासह वसूल करणेत येईल.

आपणास पोलीस शिपाई पदाचे मूलभूत प्रशिक्षण, पोलीस मुख्यालय, सातारा व पोलीस प्रशिक्षण विदयालय येथे यशस्वीरित्या पूर्ण करावे लागेल. प्रशिक्षणाचे दरम्यान आपली वर्तणूक चांगली नसल्याचे आढळून आल्यास किंवा अनाधिकृत्त गैरहजर राहील्यास आपली सेवा केव्हाही कोणतीही पूर्व सूचना न देता संपुष्टात आणण्यात येईल.

पोलीस शिपाई या पदावर नियुक्त केलेल्या उमेदवारास या पदासाठी विहित केलेले प्रशिक्षण पूर्ण करावे लागेल व संबंधित परीक्षा चार संधीमध्ये उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. जर चार संधीमध्ये उमदेवार परीक्षा उत्तीर्ण झाला नाही तर त्याची सेवा समाप्त करण्यात येईल. या कालावधीत वार्षीक वेतनवाढ अनुज्ञेय असणार नाही.

सदरची नेमणुक ही तात्पुरत्या स्वरुपाची आहे.आपण पोलीस खात्यात कायम होईपर्यंतचे दरम्यान कधीही आपले काम असमाधान कारक अथवा आपली वर्तणूक चांगली नसल्याचे आढळून आल्यास कोणतेही कारण अथवा नोटीस न देता सेवेतून काढून टाकण्यात येईल.

नेमणूक झाल्यानंतर आपणास किमान एक महिन्याची पूर्व नोटीस दिल्याशिवाय राजीनामा देता येणार नाही. अथवा आपणास एक महिन्याचे वेतन शासनास अगावू जमा करावे लागेल. आपला राजीनामा स्वीकृत झाल्यानंतर आपणांस पुन्हा पोलीस खात्याचे सेवेत नेमणूक मिळणेबाबतच्या विनंतीचा विचार करण्यात येणार नाही. तसेच वर नमुद केलेप्रमाणे सर्व खर्च प्रशिक्षण कालावधीत अदा केलेल्या वेतन व भत्त्यासहीत वसुल करण्यात येईल.

**( संदीप पाटील )** भा.पो.से
**पोलीस अधीक्षक, सातारा**

**प्रति,**

सर्व संबंधीतांना

२/-उपरोक्त उमेदवारांनी दिनांक १२/१०/२०१७ रोजी राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय सातारा येथे बिनचुक हजर रहावे.

**प्रत : रापोनि पोलीस मुख्यालय सातारा.**

२/- उपरोक्त उमेदवारास हजर करुन घेण्यात येवून, हजर झाल्याबाबतचा दिनांकासह पूर्तता अहवाल सादर करावा.

**प्रत :** प्रमुख लिपीक लेखा शाखा/आस्थापना शाखा/जिल्हा पोलीस पत्रक.

**प्रत :** भांडारपाल, पोलीस मुख्यालय, सातारा.

२/-उपरोक्त उमेदवारास किट सरंजाम पुरविण्यात यावेत. तसेच बक्कल नंबर देण्यात येवून, देण्यात आलेले बक्कल क्रमांक बाबतची माहिती कार्यालयास सादर करावी.